Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
OneTime Serial Rights

# पॉलीची कथा

आमची शेजारीण जेन एक दिवस “हवाईला सुट्टीसाठी जायचंय पण पैसे नाहीत” म्हणून माझ्याकडे तक्रार करत आली. “पैशासाठी नोकरी धर पार्टटाईम” असा मी तिला सल्ला दिला. काही दिवसांनी जेनच्या घरी डॅटसन जातीच्या कुत्र्याचं एक पिल्लू उगवलं. हे पिल्लू हॉट डॉगला पाय फुटल्याप्रमाणे किंवा चिंचोळ्या पिंपाला आडवं करून आखूड पाय लावल्यासारखं दिसत असे. सरपटल्यासारखं ते चालायचं. आखूड शेपटी, तोकडे पाय, अगदी ताज्या दमाचा प्रेमभंग झाल्यासारखा सदोदित करुण चेहरा असा त्या पिल्लाचा-पॉलीचा अवतार होता. मग मला शोध लागला की, ही कुत्री जेनने कुत्र्याच्या आवडीच्या शुद्ध हेतूने आणली नव्हती. तिला ब्रीड करून पिल्लं विकून जेनला हवाईची ट्रीप काढायची होती. पैशासाठी नोकरी कर हा मी (अर्थात जेनने मला न विचारता) दिलेला सल्ला डावलून ती त्या नसत्या फंदात पडली होती.

कुत्री पॉली मोठी होऊन लवकरच वयात आली. तिच्यासाठी योग्य वर जेनने शोधून काढला. जेनला वाटलं की, झालं आता काम ! एक दिवस जेनच्या कारमध्ये बसून चिपची वरात जेनकडे आली. आल्यावर बँड नसला तरी मुलांनी टाळ्या पिटून व पॉली या वधूने भुंकून चिप् या घरजावयाचं स्वागत केलं. दिवसभर पॉली व चिप् एकमेकांवर गुरगुरत राहिले. पॉली त्याला जवळ यायला देईना. जेनने त्यांना एका खोलीत कोंडून पाहिलं, पण व्यर्थ. शेवटी शरद व बॉब (जेनचे मिस्टर) या दोघांनी “कुत्रा कुत्रीला पार्कमध्ये फिरायला नेऊन प्रेमात पाडतो” अशी जेनला आशा दाखवली. बराच वेळ ते दोघे व कुत्र्यांची जोडी पार्कमध्ये फिरत राहिली. चिप् व पॉली प्रेमात पडायच्या ऐवजी इतरच काही प्रेमवीर (कुत्रे) पॉलीच्या मागे लागले. ते सजातीय (पॉलीच्या जातीचे) नसल्याने त्यांना हाकलवताना शरद बॉबचा दम निघाला. मी, “तुम्ही पार्कमध्ये पाऊस पडताना पॉली व चिपला घेऊन जा. तिथे हिंदी सिनेमात होते तशी भानगड होऊन तुमचे काम फत्ते होईल.” मी असा सल्ला दिला. दमलेला शरद त्यातला विनोद न समजून घेता, “जादा

आगाऊपणा करू नकोस” म्हणून माझ्या अंगावर खेकसला. शेवटी नवरी नवऱ्याला चावली. जेन तर हताश झाली. ‘पॉलीचं बाशिंगबाळ कमी व हे जबरदस्तीचं लग्न काही जमणार नाही’ असं ठरवून तिने चिप् या घरजावयाची रवानगी त्याच्या माहेरी केली.

आणखी काही दिवसांनी, “पॉली, चिप् के बच्चेकी माँ बननेवाली हैं !” असा शोध जेनला लागला. तिला हर्षवायू झाला. चिपने आपली कामगिरी बजावली होती. पिल्लांना विकून आलेल्या पैशात आपण हवाईला जायचं असं जेनने ठरवलं, व ती हवाईची स्वप्नं (अंडी उबवण्या आधीच पिल्लं मोजून) पाहू लागली. पॉलीचं जमिनीपासून एक इंचावर असणारं पोट मोठं होत गेलं. शेवटी ते इतकं मोठं झालं की जमिनीला घासू लागलं. पॉलीचे पायही पोटाला घासू लागले व ती चालू लागली की चालण्याऐवजी सरपटणे किंवा घरंगळणे यांपैकी काही तरी चालू आहे असं वाटू लागलं. शेवटी पॉलीला चालता येईना. तिच्या पोटाचे घासून प्रथम केस गेले व नंतर चामडी सोलली गेली शेवटी जेनने तिला व्हेटकडे नेले. व्हेट म्हणाला, “एकतर फार पिल्लं आहेत. किंवा...” तो क्षणभर गप्प झाला, मग म्हणाला “हिला थोडे दिवस ॲडमिट करून दिवस भरले की, सिझेरियन करावं लागेल. पिल्लं मोठी आहेत” थोडक्यात पॉलीचं नैसर्गिक बाळंपण होणार नव्हतं.

पॉली एका पिंजऱ्यात ॲडमिट झाली. एका रात्री तिची परिस्थिती फार कठीण झाली. तिला श्वास घेता येईना म्हणून व्हेटने इमर्जंसी सिझेरियन केले. सकाळी सात वाजता जेनकडे “पाच पिल्लं झाल्याचा आणि पिल्लं व बाळंतीण सुखरूप” असल्याचा फोन आला. आम्हा सर्वांना नातवंड झाल्याप्रमाणे आनंद झाला. मुलांना शाळेत पिटाळून आम्ही चौघेही पिल्लं पाहायला गेलो. (कामाला दांडी) ती पाच पिल्लं पाहताच- माझा जनावरी आयक्यू शरदच्या मते मायनस नंबरात असला तरी-काहीतरी घोटाळा झाला आहे हे मला लगेच कळलं. पिल्लं हॉटडॉग जातीची नव्हती. हिंदी सिनेमाचा परिणाम मनावर झाल्याने, ‘रात्री बहुधा मिक्सअप् होऊन पॉलीच्या पिल्लांची दुसऱ्या कुत्रीच्या पिल्लांशी अदलाबदल झाली असावी’ अशी शंका मला आली. मी इतर जाणकारांकडे पाहिलं. त्या सर्वांच्या चेहऱ्यावर कृष्णाच्या तोंडात विश्व दिसल्यावर यशोदेच्या चेहऱ्यावर जसे भाव असतील तसेच भाव होते. जेनच्या चेहऱ्यावरच्या त्या भावनेचं हळूहळू क्रोधात रूपांतर होत चाललेलं पण माझ्या लक्षात आलं. आणखी काही क्षणाने जेन आपल्या मुलीला वाईट वळण लावल्याचा सात्विक संतापाने बॉबकडे वळली (खरं म्हणजे तिला पॅसिफिकच्या तळाला हवाईची ट्रिप दिसत होती.)

“मस्ट बी यू”, ती चवताळून पण आवाज हळू ठेवायचा प्रयत्न करत बॉबला म्हणाली, “तू तिला पार्कमधये फिरायला नेलं होतंस ?”

“आम्ही कुठल्याही कुत्र्याला तिच्याजवळ फिरकू दिलं नव्हतं, शरदला विचार हवं तर” बॉब अजून होशमध्ये आला नव्हता. म्हणून त्याने हे फारच सरळ उत्तर दिलं.

“तू दिलंच असणार” जेन फिस्कारली. तिला पुढचे शब्द सापडेनात. त्या कुत्र्यांच्या पिल्लांच्या नर्सरीसमोर पब्लिकमध्ये उच्चारण्यायोग्य सभ्य शब्द ती शोधत होती. ‘उंदराला मांजराची साक्ष’ मी मनातल्या मनात म्हटलं. एव्हाना काय घोटाळा झाला हे माझ्या लक्षात येऊ लागलं होतं. मलाही शरद व बॉबच्या कुत्रीवर लक्ष ठेवण्याबद्दल शंका होतीच. आता मला व्हेटच्या अध्याहृत वाक्याचा अर्थ लागला होता. थोडक्यात पिल्लांचा बाप चिप् नसून अल्सेशियन, गोल्डन रिट्रीव्हर वगैरे जमातीचा राक्षस होता. त्यामुळे पॉलीला बाळंतपणात फार त्रास झाला होता. पॉलीने आंतरजातीय विवाह केला होता. एव्हाना शरदला तशा आणीबाणीच्या परिस्थितीतही हसूं येऊ लागलं होतं. जेन व बॉबमध्ये थर्ड वर्ल्ड वॉर होणार ही चिन्हे स्पष्ट दिसू लागली होती. त्यांना प्रायव्हेटली भांडू देण्यासाठी ‘आपण पॉलीला पाहू या’ असं म्हणत मी युद्धभूमीपासून पाय काढता घेतला.

पॉली ही बाळंतीण आपल्या पिंजऱ्यात डोळे अर्धवट उघडे ठेवून ‘प्यार किया तो डरना क्या ?’ असे चेहऱ्यावर भाव आणून उभी होती. पोटावरचा ताण गेल्यामुळे, पोटावरच्या प्रचंड लांबीच्या शिवलेल्या जखमेची जाणीवही तिला नव्हती. पोटावरचं प्रचंड वजन गेल्याने आज ती आनंदात आहे व आम्हाला बघून मोनालिसा स्टाईल मंद स्मित करते आहे असा मला भास झाला.

मी परत नर्सरीत गेले. आता एक नर्स जेनला, त्या पिल्लांना कसं बाटलीने दूध पाजायचं हे शिकवत होती. कारण पॉलीला ह्या लिलिपुटच्या आईला त्या प्रचंड पिल्लांना दूध पाजून वाढवणं शक्यच नव्हते. बॉब एव्हाना अंतर्धान पावला होता.

घरी आल्यावर माझ्या मुलांनी मला बाजूला ओढून एक गुप्त पण महत्त्वाची बातमी सांगितली. त्या सर्वांना (माझ्या व जेनच्या मुलांना) जेनने पॉलीला कायम तुरुंगात डांबून ठेवल्याबद्दल मोठ्या माणसांचा राग येत होता. म्हणून एकदाच पॉलीला सर्वांच्या नकळत त्यांनी थोडा वेळ मोकळं सोडलं होतं. मला अखेरीस पॉलीच्या पिल्लांचं रहस्य उलगडलं. तिला मोकळी सोडली असताना ‘कुण्या चांडाळाने डाव साधला होता.’ (जेनच्या दृष्टीने) “तुम्ही

तुमचं तोंड बंद ठेवा.” मी त्यांना दम भरला. “नाहीतर तुम्ही सुटाल पण जेनची मुलं मार खातील.” ‘मुलांना या सर्व घोटाळ्याला आपण कारण झालो आहोत’ हे जाणवलं व थोडावेळ वाईट वाटलं. दोन दिवस शरद व मी रोज रात्री, “घडलं ते विनोदी नाही ?” म्हणून (मुलं झोपल्यावर) हसत होतो.

आठ दिवसांनी, तीन तासांनी फिडिंग्ज करून दमलेली जेन भेटली. पॉलीचं व्हेटचं बिल भरायला ती पार्ट टाईम जॉबच्या शोधात होती. तीन महिन्यांनी तिने ती सर्व पिल्लं फुकट कुणाकुणाला देऊन टाकली आणि पॉलीचा कायमचा बंदोबस्त करून टाकला.

पूर्वप्रसिद्धी, पशुप्रेमियांच्या दुनियेत

स्नेहवर्धन प्रकाशन जून १९९४